महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २११ वा | दिनांक : १४/०६/२०२५ | वार : शनिवार

# स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन्ही राष्ट्रवादींची युती?



**मुंबई** : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून महत्त्वाची माहिती समोर आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप वगळता इतर कोणत्याही पक्षाशी युती करण्यास पक्ष सकारात्मक असल्याचे पक्षातील वरिष्ठ सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे, यामध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षही पर्याय असणार आहे. यामुळे काका-पुतणे एकत्र येणार का? याची चर्चा सुरू आहे.

राज्यात गेल्या तीन ते चार वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत हालचाली वाढल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले. त्यानंतर राज्य सरकारने महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी प्रभाग रचना करण्याचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे संपूर्ण राज्यात राजकीय वातावरण तापू लागले असून, सर्वच पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत.

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाजप वगळता कुणाशी देखील युती करण्यास तयार असल्याची माहिती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ सूत्रांनी माहिती दिली आहे. यामुळे युतीसाठी अजित पवार यांच्या पक्षाचा ही पर्याय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी खुला राहणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून युतीबाबतचे सर्व अधिकार स्थानिक पातळीच्या नेत्यांवर सोपवले जाणार आहेत, अशी माहिती देखील सूत्रांकडून देण्यात आली आहे.

महाविकास आघाडीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी एकत्र येण्याबाबत फारसे इच्छुक नसल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या युतीबाबत अनिश्चितता कायम आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, महाविकास आघाडीतील घटक पक्ष या निवडणुकीसाठी स्वतंत्र लढण्यासाठी इच्छुक असल्याची देखील माहिती आहे. अद्याप महाविकास आघाडीत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र येण्याबाबत कोणतीच चर्चा नाही, अशी माहिती देखील आहे.

# मुंबईत भाजप पदाधिकारी एकमेकांना भिडले



**मुंबई** : मुंबईत भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे समोर आले आहे. कांदिवली येथे भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांच्या उपस्थितीत बैठक होणार होती. या बैठकीपूर्वीच भाजपच्या दोन गटात राडा झाला. आशिष शेलार यांच्या समोरच दोन्ही गटातील कार्यकर्ते एकमेकांना भिडले. यावेळी तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. कांदिवली पूर्वच्या जानुपाडा येथे हा प्रकार घडला आहे.

मंत्री आशिष शेलार हे जानुपाडा येथील रहिवासी, पदाधिकारी यांना भेटण्यासाठी आले होते. जानुपाडा इथल्या रहिवाशांसमोर सध्या वन जमीन मालकीच्या वादात अडकले आहेत. येथील जमीन वन जमीन आहे की नाही? असा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे इथल्या लोकांना मूलभूत सुविधा उपलब्ध होत नाही. याचा आढावा घेण्यासाठी आशिष शेलार आज इथे आले होते. तेव्हाच भाजपच्या दोन गटात वाद झाला आणि वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.

आशिष शेलार यांच्या गाडीसमोरच कार्यकर्ते एकमेकांना मारत होते. हा वाद शेवटी पोलिस ठाण्यात पोहोचला. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी दखल घेत वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. परंतु या घटनेमुळे भाजपमधील अंतर्गत वाद समोर आला आहे. यावेळी एका कार्यकर्त्याने म्हटले की, हा आमच्या पक्षातील वाद आहे. वरिष्ठ याची दखल घेतील. आता मेडिकल चाचणीसाठी चाललो आहोत. त्यानंतर वरिष्ठ जो निर्णय घेतील त्यानुसार पुढील कार्यवाही करू.

काही दिवसांपूर्वीच मुरबाड नगरपंचायतीत उपनगराध्यक्ष निवडणुकीवरून भाजपमध्ये मतभेद पाहायला मिळाले होते. या निवडणुकीत स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी उपनगराध्यक्ष पद शिवसेनेच्या उमेदवाराला दिले. याला विरोध करत भाजपच्या १० पैकी ९ नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन केला आणि निवडणुकीत पक्षाने घेतलेल्या निर्णयाविरोधात अपक्ष उमेदवाराला मतदान केल्याचे समोर आले.

# सुजय विखे-पाटील यांचाही लोकसभेत पराभव; त्यांनीही उपोषणास बसावे : राजू शेट्टी यांचा पलटवार

**मुंबई** : शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी यासह इतर मागण्यांसाठी प्रहार संघटनेचे नेते माजी आमदार बच्चू कडु यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस आहे. मात्र, भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बच्चू कडु यांचे उपोषण प्रसिद्धीसाठी असल्याचा आरोप केला होता. त्यावर आता शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी पलटवार केला आहे. सुजय विखे पाटील यांनीही उपोषणास बसावे असे आव्हान त्यांनी दिले आहे.

या संदर्भात राजू शेट्टी यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. बच्चू कडूचे उपोषण हे प्रसिद्धीसाठी आहे. बच्चू कडूंना विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे शल्य असेल, अशा शब्दात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टीका केली होती. त्याला राजू शेट्टी यांनी प्रत्युत्तर दिले आहे. यात त्यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांचे पुत्र माजी खासदार सुजय विखे पाटील यांचाही उल्लेख केला आहे. बच्चू कडु यांच्या प्रमाणे सुजय विखे यांचा देखील लोकसभा निवडणुकीत पराभव झाला होता. त्यामुळे त्यांनी देखील संपुर्ण कर्जमुक्तीसाठी आमरण उपोषणास बसवावे महाराष्ट्रातील शेतकरी तुमच्या सोबत येईल, असे आव्हान दिले आहे.

बच्चू कडूचे उपोषण हे प्रसिद्धीसाठी आहे. बच्चू कडूंना विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे शल्य असेल, अशा शब्दात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टीका केली होती. त्यावर राजू शेट्टी यांनी एका पोस्टच्या माध्यमातून विखे पाटील यांच्यावर पलटवार केला आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, विखे पाटील साहेबांनी बोललेले वाक्य म्हणजे शेतकरी आंदोलनास गालबोट लावण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या तोंडातील शब्द आहेत. बच्चू कडु यांचे उपोषण जर प्रसिध्दीसाठी असेल तर सुजय विखे -पाटील यांचाही लोकसभेत पराभव झाला आहे. उद्यापासून सुजय विखे यांना संपुर्ण कर्जमुक्तीसाठी आमरण उपोषणास बसवावे महाराष्ट्रातील शेतकरी तुमच्या सोबत येईल.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी बच्चू कडु यांनी अमरावती येथील मोझरी या गावी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज सहावा दिवस आहे. बच्चू कडु यांची प्रकृती चांगलीच खालवल्याचे समोर आले आहे. त्यांना सकाळी रक्ताच्या उलट्या झाल्या असून त्यांनी उपचार घेण्यास नकार दिला आहे. कुठलीही सलाईन घेणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांची खालावलेली प्रकृती बघून एका कार्यकर्त्याने विष प्राशन करत आत्महत्या करण्याचा देखील प्रयत्न केल्याचे समजते. हे असेच सुरू राहिले तर आंदोलन चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ जून २०२५

## वादळी वाऱ्याचा तडाखा, हजारो झाडे कोसळली एकाचा मृत्यू





**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड तालुक्यातील डोंगरपट्टा भागात दि. १२ जून रोजी सायंकाळी झालेल्या अती जोरदार वादळी वाऱ्यास झालेल्या पावसाने मोठ्या प्रमाणात झाडे पडली, तर कोळवाडी शिवारातील शेड ची भींत कोसळून एकाचा मृत्यू झाला आहे.गुरुवारी सायंकाळी सहा वाजे पासून वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. कन्नड येथील मासे विक्रेते समाधान बंडू गवळी हे कोळवाडी येथे मासे विक्री करुण घरी जात असतांना वादळ पावसा पासून आश्रयासाठी एका शेड च्या आडोशाला थांबले. शेड ची भींत कोसळून गंभीर जखमी झाले. ग्रामीण रुग्णालय कन्नड दाखल करण्यात आले. डॉ. शेख यांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. जोरदार पाऊस वादळाचे थैमान रात्री उशीरा पर्यंत सुरु होते.यात परिसरातील हजारो झाडे कोसळली, वीजेचे खांब पडल्याने अंधानेर, वडनेर, उपळा, विभागातील वीज पुरवठा खंडीत झाला. रस्त्यावर झाडे पडल्याने जि.म. क्र. २४, २५ शुक्रवार पर्यंत बंद होता. परिणामी कन्नड शहराशी असलेला संपर्क तूटला. शेकडो घरां वरील पत्रे उडाली, भींती कोसळून प्रचंड नुकसान झाले. कळंकी येथील दहा ते पंधरा शेडनेट उडून लाखो रुपयांचे नुकसान झाले. जोरदार वार्या मुळे कांदा चाळीत पाणी शिरुन कांदा उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. वादळा चा फटका शेती शिवारासह जंगलांतील वनराई ला ही बसला यात हजारो झाडे कोसळली, परिसरातील वीज पुरवठा खंडीत झाल्याने पाणी पुरवठा ही विस्कळीत झाला. नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुण नुकसान भरपाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## मनपाच्या उद्यानाचे द्वार कोसळून मृत्यूस कारणीभूत सर्वांचीच उच्च स्तरीय समिती नेमून चौकशी करा- राजेंद्र दाते पाटील यांची मागणी





**मुंबई (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर मनपा शहर परिसरात बुधवारी ११ जून २०२५ रोजी सायंकाळी सिद्धार्थ उद्यान येथील वास्तू कोसळून निष्पाप नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत कंत्राटदार आणि बेपर्वाइ करून वास्तु पूर्णत्वाचे योग्यता प्रमाणपत्र देणाऱ्या संबंधित सर्वच दोषींवर गुन्हा दाखल करून या गंभीर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमुन सत्यता जनते समोर आणि अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मंत्री नगर विकास विभाग एकनाथ शिंदे यांचे कडे पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली. आपल्या सविस्तर निवेदनात त्यांनी नमुद केले की,शहरात असुन सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास सिद्धार्थ उद्यानाचे सिमेंटचे गेट पर्यटक पथ विक्रेत्यांच्या अंगावर पडले यावेळी प्रचंड गोंधळउडून आक्रोश सुरू झाला.पर्यटक [illegible] वाहिले.वादळात सिद्धार्थ उद्यानाचे मुख्य प्रवेशद्वार पर्यटकांच्या अंगावर पडून दोन महिलांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला.यात ४ जण किरकोळ जखमी आहेत. स्वाती अमोल खैरनार वय ३७, शिवनेरी कॉलनी, रांजणगाव शेणपुंजी व रेखा हरिभाऊ गायकवाड, वय ६५, रा. एन ११ गजानननगर, हडको अशी मृत महिलांची नावे आहेत.निष्पाप नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत कंत्राटदार आणि बेपर्वाइ करून वास्तु पूर्णत्वाचे योग्यता प्रमाण पत्र देणाऱ्या संबंधित सर्वच दोषींवर गुन्हा दाखल करून या गंभीर प्रकरणात न्याय द्यावा आणि गुन्हा दाखल करणे आवश्यक स्वाती खैरनार, रेखा गायकवाड यांच्या डोक्यावरच सिमेंट आणि विटा कोसळल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.तर शेख अकील रहीम हा गंभीर जखमी झाला आहे. इतर ४ जण किरकोळ जखमी झाले आहेत मृतांच्या नातेवाइकांना दहा लाख रुपयांची मदत तात्काळ करावी आणि मयताच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शैक्षणिक पात्रते नुसार थेट मनपा सेवेत समावून घ्यावे घडलेली घटना दुर्देवी आहे. यामुळे या प्रकरणात हलगर्जी करणाऱ्या कंत्राटदारा वर आणि या वास्तूस कशाचे आधारे बांधकाम करण्याची परवानगी दिली होती याच्या सह देखरेख करणारे अभियंते यांची ही चौकशी होऊन त्यांचेवर देखील तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे आदेश होणे गरजेचे असुन तज्ञ वरिष्ठ चौकशी समिती नेमावी आणि मनपाच्या व मनपाच्या ताब्यातील सर्वच इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी करुन मनपा प्राणी संग्रहालयात देखील उच्च शिक्षीत पशु वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सुद्धा उपलब्ध नाही म्हणुन मनपातील अनुभवी उच्च शिक्षीत सर्जन यांना तात्काळ नियुक्त करण्याचे आदेश व्हावेत अशी ही मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली आहे.






## समृद्धी महामार्गावर अवैध्य वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर किनगाव पोलिसांची धडक कारवाई








**बुलढाणा (महेश मुंढे) :** गेल्या काही दिवसांपासून समृद्धी महामार्गावर सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकी संदर्भात अनेक वृत्तपत्रात बातम्या प्रसारित केल्या गेल्या त्यानंतर प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष घातले व दिनांक १२ जून २०२५ ला रात्री च्या सुमारास किनगाव राजा पोलिसांनी धडक कारवाई करत चार लाखाचा मुद्देमाल जप्त केला व दोन आरोपींना अटक केली हे कारवाईचे सत्र पुढेही असेच सुरू राहील असे देखील किनगाव राजा पोलिसांनी सांगितले. तढेगाव शिवारात समृद्धी महामार्ग, नागपूर लेन, चॅनल क्रमांक ३१९ वर रात्री ८:४० ते ९:०० वाजेदरम्यान एक अवैद्य वाळूने भरलेला चार ब्रास टीप्पर पोलिसांनी सापळा रचत जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा क्रमांक १५१ / २०२५ गजानन धनाजी वाघ व देविदास फकीरबा निकम रा. जवळ खेड ता. देऊळगाव राजा टिप्पर क्रमांक एम एच २८ बीबी ३८ ५१ एकूण रक्कम चार लाख रुपये किमतीचे जप्त केले व त्यात चार ब्रास अवैध वाळू आढळून आली आहे. आरोपींविरोधात विविध कलमानखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शरद ठोंबरे यांच्या उपस्थितीत करण्यात आली व पुढील तपासाची जबाबदारी पोलीस हेडकॉन्स्टेबल विष्णू मुंढे यांच्याकडे देण्यात आली आहे, पोलीस कॉन्स्टेबल सुभाष गीते यांनी फिर्याद दाखल केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ जून २०२५


## विद्युत खांब कोसळला टाकळी कदिम गावाचा वीज पुरवठा खंडीत



**दौलताबाद (जावेद अहमद) :** टाकळी कदिम व जांभळा तालुका गंगापूर गावाच्या दरम्यान गट क्रमांक १५२ मध्ये दि 12 गुरुवारी संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास जोरदार वाऱ्यामुळे विद्युत पुरवठा करणाऱ्या मुख्य विद्युत वाहिनीचा खांब कोसळल्यामुळे टाकळी कदीम गावाचा विद्युत पुरवठा खंडित झाला. टाकळी कदिम गावाला माळीवाडा सब स्टेशन येथून विद्युत पुरवठा करण्यात येतो गुरुवारी संध्याकाळीच्या वेळेस जोरदार वाऱ्यासह पाऊस पडला असल्याने चंद्रकांत कचरू चंदेल गट न १५२ शेतात असलेला पोल कोसळला सुदैवाने काही अंतरावर मजूर काम करत होते बाजूला शिवाजीराव चंदेल यांचे शेत गट क्र १५०/२ जांभळा शिवार यांच्या शेतात तारा लटकल्या यामुळे रात्रभर संपूर्ण गाव अंधारात होता माजी सरपंच शिवाजी चंदेल ; यांनी सांगितले सदर खांब बाबत आम्ही महावितरणच्या माळीवाडा येथील कार्यालयाशी संपर्क साधून माहिती दिली होती जर उन्हाळ्यातच याकडे लक्ष दिले असते तर ही दुर्घटना घडली नसती दुरुस्ती करताना योग्य पध्दतीने करावी नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी कारण शेतात मूग व सफेद मूसळी लावली आहेयाबाबत महावितरण चे सहायक उपअभियंता एम.ए.हकीम यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले जोरदार पाऊस व वारा असल्याने हा खांब तुटला होता आमचे कर्मचारी यांनी रात्री फॉल्ट शोधत असताना खांब तुटलेला मिळून आले रात्री दुरुस्ती करणे शक्य नव्हते म्हणून विद्युत पुरवठा बंद करण्यात आले होते आम्ही शुक्रवारी कर्मचारी बोलून दिवसभर दुरुस्ती करून संध्याकाळी विद्युत पुरवठा पूर्ववत केले आहे

## श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर, कन्नड च्या इतिहासात सुवर्ण अध्याय!




**कन्नड (स्वप्नील राठोड)** कन्नड तालुक्यातील सुप्रसिद्ध व गुणवंत संस्था श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर हिच्या माजी विद्यार्थिनी आश्विनी परकाळे यांनी आपल्या कर्तृत्वाने संपूर्ण जिल्हा, तालुका आणि शाळेचा मान उंचावला आहे. UPSC परीक्षेत यश मिळवून त्यांची निवड IFS (Indian Forest Service) या देशातील अत्यंत प्रतिष्ठित सेवेसाठी झाली आहे! २००४-०५ साली या विद्यालयात शिक्षण घेतलेल्या आश्विनी परकाळे यांचे प्राथमिक शिक्षण याच शाळेत झाले. २३ मे २०२५ रोजी जाहीर झालेल्या अंतिम मुलाखत निवड यादीत त्यांचे नाव उजळून निघाले आहे.संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि संपूर्ण शाळा परिवाराकडून आश्विनी ताई व त्यांच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या

## विमानातून काळच आला होता, पण मी वाचले



**अकोला :** गुजरातच्या अहमदाबाद येथे बुधवारी झालेल्या विमान अपघातात अकोल्याची ऐश्वर्या तोष्णीवाल ही तरुणी थोडक्यात बचावली. ही दुर्घटना घडली तेव्हा ती आपल्या वसतिगृहाच्या पाचव्या मजल्यावरील खोलीत झोपली होती. अचानक झालेल्या आवाजाने तिचे डोळे उघडले आणि त्यानंतर जिवाच्या आकांताने गर्दीतून वाट काढत कसाबसा स्वतःचा जीव वाचवला. तिने स्वतःच आपल्या पालकांशी संवाद साधताना ही माहिती दिली आहे.

ऐश्वर्या तोष्णीवाल ही अहमदाबादच्या गुजरात कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्युट मेडिकल कॉलेजमध्ये डीएम अँकोपॅथोलॉजीच्या दुसऱ्या वर्षात शिकत आहे. ती नुकतीच आपल्या आजोबांचा वाढदिवस साजरा करून अकोल्याहून अहमदाबादला परतली होती. गुरूवारी दुपारी तिच्या हॉस्टेलच्या इमारतीवर एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळले आणि त्यात तिच्या काही सहकारी डॉक्टरांसह एकूण २६५ जणांचा बळी गेला. या दुर्घटनेत ऐश्वर्या स्वतः बालंबाल बचावली.

यासंबंधीच्या माहितीनुसार, विमान कोसळले तेव्हा ऐश्वर्या हॉस्टेलच्या एका दुसऱ्या इमारतीत पाचव्या मजल्यावर झोपली होती. अचानक एक मोठा आवाज झाला. सर्वत्र धुराचे लोट पसरले. यामुळे तिची झोपमोड झाली. तिने उठून पाहिले असता खोलित सर्वत्र काळा धूर पसरला होता. तिने परिस्थितीचा अंदाज घेतला आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत स्वतःला एका ब्लँकेटमध्ये गुंडाळले. त्यानंतर अंधार व धुराच्या गर्दीतून मार्ग शोधत पाचव्या मजल्यावरून खाली उतरली. असे करताना तिचा चेहरा, हात व पाय काही जागी भाजले. पण या दुर्घटनेत तिच्या हॉस्टेलमधील जवळपास २० ते २५ प्रशिक्षणार्थी डॉक्टरांचा बळी गेला.

ऐश्वर्याने घाबरलेल्या अवस्थेत आपले वडील अमोल तोष्णीवाल यांना फोन केला. त्यांना घटनेची माहिती दिली. तिने फोन केला तेव्हा तिचे वडील अकोल्याच्या दुर्गा चौकातील आपल्या साड्यांच्या दुकानात होते. मुलीचा फोन येताच ते हादरले. आपले दुकान बंद करून ते तत्काळ घरी गेले. ते म्हणाले, टीव्हीवरील बातम्या पाहून आमचे डोके सुन्न झाले होते. पण देवाच्या कृपेने आमची मुलगी एवढ्या मोठ्या संकटातून बचावली.

ऐश्वर्याची आई माधुरी तोष्णीवाल व आजी-आजोबांच्या डोळ्यांतही यावेळी अश्रू तरळले. माझी नात नुकतीच माझ्या वाढदिवसासाठी आली होती. तिला अशा गंभीर प्रसंगाला सामोरे जावे लागले. ती सुखरूप असल्याबद्दल मी शंभरवेळा देवाचे आभार मानतो, असे ऐश्वर्याच्या आजोबांनी सांगितले. दरम्यान, माझ्या आयुष्यातील हा सर्वात भयावह अनुभव होता. मी तो केव्हाच विसरणार नाही. विमानाच्या रुपात काळच आला होता, पण मी बचावले, अशी भावना ऐश्वर्याने या दुर्घटनावर भाष्य करताना व्यक्त केली.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ जून २०२५


# दहशतीच्या सावटाखाली शैक्षणिक आणि बौद्धिक स्वातंत्र्य!!

आजकाल जेव्हा मी माझ्या शैक्षणिक कारकिर्दीचा विचार करतो, तेव्हा मला वाटतं की मी खूप नशीबवान आहे. तीन दशकांहून अधिक काळ मी संस्कृती, राजकारण, समाज आणि शिक्षण यावर विद्यापीठात विद्यार्थ्यांना शिकवलं, व्याख्यानं दिली, चर्चासत्रांमध्ये बोललो आणि त्यावर लिहिलं. मी कोणाच्या भावना दुखावल्या नाहीत; कोणताही एफआयआर माझ्यावर दाखल झाला नाही; आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, कोणीही न्यायव्यवस्थेतून मला माझ्या लिखाणाच्या आशयाबद्दल किंवा शैलीबद्दल सावध केलं नाही. अर्थात, प्रत्येकाला माझी विचारसरणी पटली असे नाही. अनेकांसोबत माझे तीव्र मतभेद होते, वाद आणि प्रतिवादही होते. तरीही, दिवसाच्या शेवटी, मी डाव्या, उजव्या, राष्ट्रवाद्यांशी, उत्तर-आधुनिकतावाद्यांशी, आंबेडकराईट आणि स्त्रीवाद्यांशी विद्यापीठाच्या कॅफेटेरियामध्ये त्यांच्यासोबत बसू शकलो, हसलो, विनोद केले आणि विविध लेख आणि पुस्तकांची देवाण-घेवाण केली. खरंच, मी माझ्या स्वातंत्र्याची कदर केली, कारण मला माझ्या वैचारिक विरोधकांचंही स्वातंत्र्य हवं होतं.पण, या बदलत्या काळात, जेव्हा मी विचार करतो, उदा. अशोका विद्यापीठातील एक तरुण प्राध्यापक अली खान महमुदाबाद, ज्याला 'ऑपरेशन सिंदूर', राष्ट्रवाद, युद्ध आणि राजकारण यावर त्याच्या काही सूक्ष्म आणि बारकाईने केलेल्या विचारांमुळे काय भोगावं लागलं. तेव्हा मला धडकी भरते. होय, या तरुण प्राध्यापकाला अटक करण्यात आली, आणि त्याला जामीन मिळाल्यावरही, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी त्याला अशा संवेदनशील विषयांवर टिप्पणी करताना सावध राहण्याचं लक्षात आणून दिलं.आपण एका अशा विषारी वातावरणाला सामान्य मानत आहोत का ? जिथे वैचारिक मतभेद संशयाच्या भोवऱ्यात आहेत, विरोधाचे वा असहमतीचे आवाज गुन्हेगार ठरवले जात आहेत आणि शैक्षणिक स्वातंत्र्याची कल्पना नाहीशी केली जात आहे?आपले शिक्षक, प्राध्यापक आणि विचारवंत यांना वर्गात येण्यापूर्वी, बोलण्यापूर्वी किंवा काही लिहिण्यापूर्वी कायदेशीर सल्ला किंवा मार्गदर्शन घ्यावं लागेल का?आपल्या शैक्षणिक आणि बौद्धिक क्षेत्राला वेढलेल्या या सर्वव्यापी भीतीमुळे आपल्याला काळजी वाटायला हवी, त्याची दोन कारणं आहेत. पहिलं, हे एका आजारी समाजाच्या आगमनाचं लक्षण आहे — असा समाज जो, भौतिक संपत्ती असूनही, खळखळून हसण्याची, विनोदाची कदर करण्याची, ज्ञानमीमांसेतील बहुविधता स्वीकारण्याची, वाद घालण्याची, चर्चा करण्याची, संवादात्मक संभाषणे करण्याची आणि मतभेदांची अपरिहार्यता स्वीकारण्याची क्षमता गमावू शकतो. खरं तर, आजारी समाज तो असतो जो सद्यस्थितीला (status quo) आव्हान देणाऱ्या सर्व विरोधाभासी आवाजांचा तिरस्कार करतो — आणि त्यामुळे राजकीय/बौद्धिक स्वातंत्र्य आणि उदारमतवादी शिक्षणाच्या redeeming power (मुक्ती देणाऱ्या शक्ती) पासून दूर पळतो. आजारी समाज हुकूमशाही प्रवृत्तीचा असतो आणि तो एका चैतन्यशील शैक्षणिक/बौद्धिक संस्कृतीवर संशय घेतो.म्हणूनच, डोनाल्ड ट्रम्पसारख्या लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या हुकूमशाही व्यक्तीला हार्वर्डसारख्या विद्यापीठात असलेल्या चैतन्यशील शैक्षणिक संस्कृती आणि बौद्धिक परंपरेच्या वातावरणात अत्यंत अस्वस्थ वाटतं, यात नवल नाही. कोण जाणे, कदाचित ट्रम्प एक आदर्श बनत आहेत, ज्यांचं अनुकरण काही आपले राजकीय नेते करू इच्छितात? दुसरं, शैक्षणिक आणि बौद्धिक स्वातंत्र्याचा अभाव राष्ट्राच्या प्रगतीला गंभीर हानी पोहोचवतो. आर्थिक उत्पादन क्षमता, लष्करी ताकद आणि तांत्रिक नवनवीन शोध यांच्या आकडेवारीपेक्षा विकास आणि प्रगतीसाठी काहीतरी अधिक महत्त्वाचं आहे, हे आपण आता स्वीकारण्याची वेळ आली आहे. आपल्या सामाजिक मूल्यांमध्ये, सामूहिक आकांक्षांमध्ये आणि जगण्याच्या पद्धतींमध्ये सर्जनशील, सूक्ष्म गंभीर विचार, नवीन कल्पना आणि बौद्धिक स्वातंत्र्यामुळे मोठे बदल होतात. उदाहरणार्थ, मार्क्सवाद, मनोविश्लेषण, लिंग अभ्यास आणि समीक्षात्मक सिद्धांतांमध्ये अंतर्भूत असलेल्या मूलगामी आणि नाविन्यपूर्ण कल्पनांमुळे आपल्याला एक नव्या प्रकारची संवेदनशीलता मिळाली. यामुळे आपल्याला दडपशाही, वर्चस्व, शोषण, पितृसत्ताक अधीनता आणि युद्धाचे मानसशास्त्र यासारख्या विचारसरणींवर भाष्य करता आले आणि आर्थिक समानता, सामाजिक न्याय आणि लोकशाही, समतावादी, शांततापूर्ण जगासाठी प्रयत्न करता आले.पण, जर आपण सर्व मूलगामी, विरोधाभासी आवाजांवर संशय घेतला आणि आपल्या महाविद्यालयांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये मुक्त विचारांची,मूल्यांकनाची भावना नष्ट केली,आपले शत्रू युद्धात पराभूत केले. आपण आपली लष्करी ताकद दाखवली आणि आपल्या आर्थिक वाढीचा अभिमान बाळगला असला तरी कोणीही आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय पतनाला (decay) रोखू शकणार नाही.अलीकडे शैक्षणिक स्वातंत्र्यात सतत घट होत आहे, ज्यात आज भारत १७९ देशांमध्ये १५६ व्या स्थानावर आहे, ही निश्चितच भूषणावह बाब नाही.एका परिस्थितीची कल्पना करा. सध्या भारत ४.३ ट्रिलियन डॉलर जीडीपीसह जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असला तरी एक प्राध्यापक आपल्या विद्यार्थ्यांना या यशाच्या रम्य कथांनी वाहून न जाण्यास सांगत आहे. त्याऐवजी, त्याला ते अधिक खोलवर जाऊन, देशातील प्रचलित सामाजिक/आर्थिक असमानतेची कठोर वास्तविकता पाहण्यास आणि त्यावर अभिमान बाळगण्याचं कोणतं कारण आहे का, याची गंभीरपणे तपासणी करण्यास सांगतो आहे. कल्पना करा की, तो आपल्या विद्यार्थ्यांना हे लक्षात ठेवण्यास सांगत आहे की, १० टक्के सर्वात श्रीमंत भारतीयांकडे देशाच्या ८० टक्के संपत्ती आहे, तर खालच्या ५० टक्के लोकांकडे केवळ ६.४ टक्के संपत्ती आहे. आणि, ग्लोबल रिच लिस्टनुसार, २९४ भारतीय अब्जाधीशांची एकूण संपत्ती देशाच्या जीडीपीच्या जवळजवळ एक तृतीयांश आहे. तो आपल्या विद्यार्थ्यांना विचार करण्यास सांगतो की, २०२४ च्या ग्लोबल हंगर इंडेक्सनुसार, भारत १२७ देशांमध्ये १०६ व्या स्थानावर असण्याचं हेच कारण आहे का? आणि, तो युक्तिवाद करतो की, वितरणात्मक न्यायाशिवाय, चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था गरीब, बेघर आणि अगदी संघर्ष करणाऱ्या मध्यमवर्गासाठी काहीच अर्थ ठेवत नाही.तो कोणतेही कटकारस्थान करणारा किंवा राष्ट्राचा शत्रू नाही. उलट, देशाबद्दलचं प्रेम किंवा सत्याप्रतीची त्याची बांधिलकी, निष्ठा त्याला सतर्क राहण्यासाठी आणि खोट्या राष्ट्रवादी उत्साहाने वाहून न जाण्यासाठी प्रेरित करते.पण, आता सगळं काही त्याच्याविरुद्ध गेलं असल्यामुळे, त्या प्राध्यापकाला देशविरोधी ठरवलं जाऊ शकतं आणि शेवटी, त्याला अटक करून पोलीस कोठडीत नेलं जाऊ शकतं.दुर्दैव हे आहे की, आजकाल विद्यापीठाचं प्रशासन शैक्षणिक समुदायाच्या बौद्धिक स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी क्वचितच पुढे येतं.त्याऐवजी, आपले अनेक कुलगुरू, ज्यांमध्ये खूप गाजावाजा केलेल्या 'उदारमतवादी खाजगी विद्यापीठांचे' कुलगुरूही समाविष्ट आहेत, त्यांना चाकोरीबद्ध मार्गाचं (official line) अनुसरण करणं सोयीस्कर वाटतं. पण, या प्रतिकूल आणि भीतीदायक परिस्थितीतही, ज्यांना अध्यापनाचं कार्य खऱ्या अर्थाने आवडतं आणि ज्यांना वाटतं की गंभीर अध्यापनाशिवाय (critical pedagogy) शिक्षण हे निरुपयोगी आहे, अशांनी आता आपलं मौन सोडून एकत्रितपणे या परिस्थितीचा सामना करायला हवा. त्यांनी अशा बौद्धिक वातावरणाच्या प्रस्थापनेसाठी लढायला हवं, अशावेळी, रवींद्रनाथ टागोर म्हणाले असते, "मन भीतीशिवाय असेल आणि मस्तक उंचावलेलं असेल." हे एक असं वातावरण जिथे नवीन विचार आणि कल्पनांना प्रोत्साहन दिलं जाईल, मतभेदांचा आदर केला जाईल आणि सत्याच्या शोधासाठी कोणतीही भीती नसेल.


**लेखक** : प्रा. अविजीत पाठक हे जे. एन. यू, नवी दिल्ली येथील समाजशास्त्राचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहे.

**अनुवाद** : प्रा. प्रियदर्शन भवरेबद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात



**साभार** : द ट्रिब्यून, चंदीगड, मंगळवार, ३ जून २०२५



१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ जून २०२५

# चौका येथील शेतकरी शहरात शोधतोय रोजगार



छत्रपती संभाजीनगर शहर म्हणजे मराठवाड्याची राजधानी. वाळूज , बजानगर, चितेगाव, बीडकीन, चिकलठाणा औद्योगिक वसाहतीमुळे नव्वदच्या दशकात या महानगराकडे ग्रामीण भागातील युवकांचे लोंढेचे लोंढे स्थलांतरित होवून छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक वसाहतीत स्थिरावले. याच काळात अनेक महत्वाचे उद्योग या शहरात आले. पुढे ते नावारूपास येवून त्यांनी येथे चांगलाच जम बसवला होता. आय.टी.आय. पास झाले की, कंपन्यात हमखास नोकरी मिळायची. त्यामुळे त्या काळात आयटीआय ला खूपच अवास्तव महत्व प्राप्त झाले होते. काही विद्यार्थी डीएड ला तर अन्य काही विद्यार्थी कृषी पदवीका ला प्रवेश घ्यायचे. अतिशय कमी वयात नोकरी मिळून ते स्थिरस्थावर व्हायचे. त्यांच्या विषयी ग्रामस्थ व युवकांना प्रचंड कुतूहल असायचे. त्यामुळेच त्याकाळी दहावी झाले की, गावातील जाणकार लोक आय टी आय करण्याचा प्रामाणिक सल्ला द्यायचे. त्यात तथ्यही होते. आजही छत्रपती संभाजीनगर जिल्हयासह मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील युवा पिढी शहरात चांगलीच स्थिरावलेली दिसते. कालांतराने नव्वद नंतर जागतिकीकरण आले. त्याचा दुरगामी परिणाम सर्वच क्षेत्रावर झाले. शिक्षणाचा प्रचार व प्रसार खेडोपाडी झाला. विनाअनुदान धोरण विशेषतः मराठवाड्यासाठी घातक ठरले. शिक्षणाचा व गुणवत्तेचा स्थर घसरला. डि. एड. ,बी एड चे सर्वत्र पेव फुटले. ढाब्यावरही हे कॉलेज दिसू लागले. प्रचंड बेकारी वाढली. त्यानंतर इंजिनियरिंग व मेडिकल ला महत्व आले. शिक्षण गरिबांच्या आवाक्या बाहेर गेले. बराच मोठा वर्ग शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर गेला. गावोगावी बेकारांचे तांडेच तांडे निर्माण झाले. काही गावातच गावगाड्यात खितपत पडले. तर काहींनी शहर गाठले. मात्र तिथेही हाल अपेष्ठाच वाटयाला आल्या. जगणे कठिण झाले. औद्योगिक वसाहतीत काँट्रॅक बेस आला आणि तिथल्या ही नोक ऱ्या बेभरोश्याच्या बनल्या. मराठवाड्यात नव्वद नंतर प्रचंड दुस्काळ पडत गेले. पर्जन्यमान कमी कमी होवून सतत दुस्काळाच्या सावटाखाली येथील शेतकऱ्यांना व शोषित उपेक्षित गावगाड्यातील बांधवांना जगावे लागले. वाढती महागाई, उत्पादन खर्चात झालेली भरमसाठ वाढ त्यामुळे शेती परवडेनाशी झाली. सालदारीचे व कडब्याचे वाढते भाव त्यामुळे जमिनी पडित पडल्या. आज मजुरा अभावी शेती करणे अवघड झाले. त्यामुळे कर्जबाजारी पणा वाढतच गेला. राजकारणाचे वाढते स्तोम. लग्न सराई व निवडणूका दारू पिण्याचे प्रशिक्षण केंद्र झाले. व्यसनांचे प्रमाण खूपच वाढले. गावाकडच्या मुलांचे लग्न थांबले. हे चित्र छत्रपती संभाजीनगर, मराठवाडा आणि महाराष्ट्रातील सर्वच गावखेड्याचे हे चित्र आज आपणास पहावयास मिळते. काहींनी पुन्हा कामधंदा व रोजगाराच्या शोधात छत्रपती संभाजीनगर गाठले. विशेषतः छ.संभाजीनगर परिसरात शेतकऱ्यांच्या जमिनी बेभाव गेल्या. शेतकऱ्यावर मजुरी करण्याची वेळ आली. त्यामुळे या परिसरातील शेतकरी, मजुर, मुले यांनी शहरात येवून रोजगार मिळवण्याचे नवे मार्ग शोधले. एक तर बेभरोश्याचे उत्पन्नाचे साधन. शहरात किरायाने राहाणे परवडत नाही, म्हणून रोज सकाळी उठून शहर गाठायचे. तिथे वाटेल ले कामे करायची. काहींनी बिगारी कामे स्विकारली, काही प्लंबर झाले. काही दुकानावर लागले. तर काही पेट्रोल पंपावर नोकरी करू लागले. त्याहीपेक्षा जाधववाडी येथे मोठा होलसोल मोंढा झाला. भाजीपाला सह फळांचा व्यापार वाढत गेला. तिथून भाजीपाला घ्यायचा व शहराच्या विविध भागात दिवसभर विकत बसायचे. पुन्हा संध्याकाळी पडेल त्या वाहनाने गाव गाठून लेकराबाळात जायचे. हे चित्र आज शहरात व परिसरातील गावात पहावयास मिळते. छत्रपती संभाजीनगर शहरात वेगवेगळ्या निमित्ताने भ्रमंती करीत असतांना या अशा विस्थापीत लोकाकडे लक्ष जाते. येता जाता मी त्यांचे निरिक्षण करतो. त्यांचे व्यवसाय, आदी बाबीवर चर्चा करतो. छत्रपती संभाजीनगर शहरात ठिकठिकाणी भाजीपाला , फळे विकणारी मुले, महिला दिसून येतात. सध्या जांभळाचे दिवस असल्यामुळे शहरात ठिकठिकाणी जांभळाच्या पाट्या विकायला घेवून आलेले लोक बघायला मिळतात. मी येता जाता त्यांच्याकडून काहीतरी घ्यावे, त्यांच्याशी चर्चा करावी, त्यांचे प्रश्न समजून घ्यावे हे नेहमीचेच झाले आहे. शहरी झगमगाटात वावरतांना गावाकडच्या या माणसांशी फटकून वागणे मला अजिबात आवडत नाही. किंवा मला त्याचा अजिबात कमीपणा वाटत नाही. आपणही त्यांचेच वारसदार आहोत. त्यांच्या पैकीच एक आहोत. शिक्षण, नोकरी मुळे शहरी जीवनात जगतो पण ती आपलीच माणसं आहेत. या भावनेने मी केवळ ग्राहक म्हणून न राहाता त्यांची आस्थेवाईक चौकशी करतो. आज असाच प्रसंग घडला. शहरात फिरतांना ठिकठिकाणी जांभळं विकणारी माणसं चौकाचौकात दिसून आली. जांभळं खरेदी करण्याच्या उद्देशाने मी त्यांच्याशी संवाद साधला. त्यातून आजचे वर्तमान वास्तव, शेती, शेतकरी आणि गावखेड्याचे अनेक प्रश्न समोर आले. खरं तर आजचे ग्रामवास्तव काय आहे. याचीही जाणिव होते. दर्गा परिसरात क्रांतीनगरकडे जाणाऱ्या उड्डाण पुलाच्या अजुबाजूला व चौका चौकात जांभळं विकणारी ही बाया माणसं दिसली. एक वयस्कर आजीबाई जांभळं विकत असल्याचे दिसले. त्यांच्या बाजूला तरुण मुले, महिलाही होत्या, परंतु मी त्या वयस्कर आजी कडून जांभळं खरेदी केले. त्यांच्याशी मी या जांभळं विकणाऱ्या लोकाविषयी, ही जांभळं कुठून आनतात आदी विषयी चर्चा करतांना तुमचे गाव कोणते ? असे विचारताच त्या म्हणाल्या, मी चौक्याची आहे. नाव आडनाव ही त्यांनी सांगितले. चौका हे छत्रपती संभाजीनगर जवळील हर्सूल सावंगी जवळ जळगाव रोडवरील एक मोठे गाव आहे. आजबाजूच्या पंचक्रोशितील गावाचे व्यापारी केंद्र . शिवाय चौका हे आमच्या पाहुण्यांचे गाव असल्यामुळे आमचे अनेक नातेवाईक त्या गावात आहेत. गावाविषयी सर्व माहिती आहे. जांभळं खरेदी करत त्यांच्याकडून बरीच माहिती मिळाली. त्यांच्या बाजूलाच एक तरुण मुलगाही जांभळं विकत होता. मी त्याच्याशी संवाद साधला. त्याच्या व माझ्या संवादातून मला बरीच माहिती मिळाली. वर्तमान शेती व शेतकऱ्यांचे , मजुरांचे प्रश्न कळाले. भयावह आजचे वर्तमान व ग्राम वास्तव ही लक्षात आले. त्याच्याकडून मिळालेली माहिती अशी - चौका गावात शेती फार थोडी थोडी आहे . कालांतराने शेतीच्या वाटण्या झाल्या. शेतीवर खर्च भागेना. एक्कर, दोनचार एक्करच्या वर शेती नाही. बहुतांश शेती कोरडवाहू व बरड. शेतीत फारसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे शेती पुरक व्यवसाय त्यांना करावे लागतात. बरेच शेतकरी चौका गणोरी शिवारात रोडवर भाजीपाला विकतात. गावातील सुमारे ३०० लोक छत्रपती संभाजी नगरात जांभळं विकतात. तेवढेच लोक गावात चौका रोडवर हायवेवर बसून जांभळं, भाजीपाला, फळे विकतात. दुध व्यवसाय करणारे १०० लोक व भाजीपाला विकणारे किमान १०० लोक या गावातील शहराच्या आसऱ्याने जीवन जगतात. जांभळं विकत घेवून तर काही रानावनातून तोडून आणतात व दिवसभर शहरात विकतात. सिल्लोड परिसरात, केऱ्हाळा येथे जांभळाचे बगीचे असल्याचे त्यांनी सांगितले. तिथूनही खरेदी करतात. त्याशिवाय डोंगरात जावून दिवसभर एक एक जांभूळ तोडावे लागते. रोज १ हजार ते पाचशे, सातशे रोज मिळतो तर कधी कधी मजुरीही निघत नसल्याचे त्यांनी सांगितले. तो म्हणाला की, आम्ही सिझनेबल धंदा करतो. आंब्यांच्या दिवसात आंबे विकतो. चार व करवंदही विकतो. तसेच अन्यवेळी भाजीपाला विकतो. त्यावर आमचे पोटपाणी चालतो, कसा तरी घर खर्च भागतो. बाया माणसं शेती सांभाळून मजुरी करतात. अंजिर, दाळदाणा ही विकत असल्याचे तो म्हणाला. वर्षभर आम्ही असे व्यवसाय करतो. सकाळीच उठून शहर गाठावे लागतात. उन, वारा, पाऊस पाणी, वाहनांचा आवाज, धूळ आदींचा सामना करीत आम्ही आला दिवस काढतो असेही तो म्हणाला. शहराच्या जवळ असूनही या गावातील मुले उच्च शिक्षण घेवू शकली नाही. शहरात जावून छोटे मोठे व्यवसाय करायचे. यातच ते अडकून पडले. त्यामुळे त्यांची फारसी प्रगती झाली नाही. शिक्षणाचे प्रमाणही जेमतेमच. मी लहानपणा पासून या गावाला तिथल्या माणसांना पहात आलोय. मला वाटले आजच्या काळात हे गाव शहराच्या खूपच जवळ असल्यामुळे फार विकसीत झाले असेल. मात्र वास्तव काही वेगळेच अनुभवावयास आले. शेतीवर उदर निर्वाह होत नाही त्यामुळे विस्थापीत होवून छोटे मोठे व्यवसाय त्यांना करावे लागते. त्यातून ही फारसे उत्पन्न मिळत नाही. पिढ्यान पिढ्याचा त्यांचा हा जीवघेणा संघर्ष केव्हा थांबेल ? त्यांच्या जीवनात विकासाचा सूर्योदय केव्हा होईल. शेती व शेतकऱ्यांची , शहराजवळील गावांची अवस्था किती भयावह आहे. व्यसनांचे प्रमाण वाढतच आहेत. ही अवस्था कमी अधिक प्रमाणात शहराजवळच्या सर्वच गावांची आहे. थोड्या फार जमिनी शिल्लक आहेत. त्यांच्यावर शहरातल्या भांडवलदारांचा डोळा आहे. शिक्षणाची कास धरल्याशिवाय त्यांना पर्याय नाही.हे आणि असे अनेक प्रश्नांचा गुंता घेवून मी तिथून निघालो. बऱ्याच अंतरावर गेल्यावरही त्यांचे भयावह जगणे खोलवर रुतत गेले. आजच्या काळात यांची ही दैन्यावस्था तर त्यांच्या पुढच्या पिढीची काय अवस्था ? या प्रश्नांनी मात्र मला अधिक अस्वस्थ केले. शेती आणि शेतकरी अधिकाधीक कंगाल होत आहे. एकूणच शेती व्यवसायच धोक्यात आला आहे. या व्यवस्थेला जाब विचारावाच लागेल.....

**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**

**मो.** 94040 00398

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002